**अतारांकित प्रश्नोत्तरांची ८ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### शक्तीपीठ महामार्गाच्या पर्यावरण विभागाकडे मंजूरीसाठी पाठवलेल्या प्रस्तावाबाबत

**(१) ३७१ (२७-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते गोवा ८०५ किमी शक्तीपीठ महामार्ग बांधण्यासाठी पर्यावरण विभागाच्या मंजुरीसाठी दिनांक १२ जानेवारी, २०२५ वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्न सादर केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व त्याअनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पवनार पत्रादेवी (नागपूर-गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाच्या पर्यावरणीय आघात अभ्यासाचे (EIA) प्रस्ताव एकूण ४ टप्प्यांमध्ये विभागलेले आहेत. प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाच्या एकूण लांबी पैकी वर्धा ते यवतमाळ (टप्पा क्र.१) व नांदेड ते धाराशिव (टप्पा क्र.२) या दोन टप्प्यांकरिता राज्य शासनाच्या राज्य पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) च्या परवानगीसाठी प्रस्ताव दिनांक १०.०१.२०२५ रोजी सादर केला आहे.

तसेच सोलापूर ते कोल्हापूर (टप्पा क्र.३) व कोल्हापूर ते सिंधुदुर्ग (टप्पा क्र.४) या लांबीतील प्रस्ताव केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MOEFCC) च्या परवानगीसाठी दिनांक १०.०१.२०२५ रोजी सादर केलेला आहे.

SEIAA ची बैठक दिनांक १३.०३.२०२५ व दिनांक १५.०३.२०२५ रोजी झाली असून टप्पा क्र. १ व टप्पा क्र.२ च्या प्रस्तावास अनुसरुन TOR ला दिनांक २९.०४.२०२५ रोजी मंजूरी प्राप्त झाली आहे.

टप्पा क्र. ३ व ४ साठी केंद्र शासनाची Expert Appraisal Committee (EAC) ची बैठक संपन्न झाली असून सोलापूर ते कोल्हापूर या लांबी करिता केंद्र शासनाने TOR मान्य केले आहेत. प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाची कोल्हापूर ते सिंधुदुर्ग लांबीच्या आखणी रेषेत घाट सेक्शन आहे. त्यामुळे सदरील आखणी करीता केंद्रीय पर्यावरण विभागाच्या तज्ञ समितीची स्थळ पाहणी झाल्यावरच केंद्र शासनामार्फत TOR ला मान्यता प्रदान करण्यात येईल,असे कळविण्यात आलेले आहे.

३) प्रश्न उद्‌भवत नाही.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विदर्भ वैधानिक विकास महामंडळ पुनजिर्वित करण्याबाबत

**(२) ४२६ (२८-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भाच्या सर्वांगिण विकासासोबतच अनुशेषावर लक्ष ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या विदर्भ वैधानिक विकास महामंडळाची मुदत संपुनही मागील ४ वर्षापासून महामंडळाच्या पुनजिर्वित करण्याबाबत निर्णय न घेतल्यामुळे संवैधानिक तरतूदींचे उल्लंघन होत असल्याचे मत नागपूर उच्चन्यायालयाने माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान व्यक्त केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भ वैधानिक विकास महामंडळाच्या मुदतवाढीसाठी राज्यशासनाने मंजूरी दिली मात्र केंद्र शासनाच्या गृहविभागाने याबाबत अद्याप निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यशासनाने वैधानिक विकास महामंडळाला मुदतवाढ मिळण्याच्यादृष्टिने केंद्रशासनाची मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१९-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय,हे खरे आहे.
(३) विदर्भ, मराठावाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन विकास मंडळाची निर्मिती दिनांक ३० एप्रिल, १९९४ रोजी झाली होती. सदर वैधानिक विकास मंडळाची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी संपृष्टात आली आहे.
त्यानुषंगाने तीन्ही विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याचा निर्णय दिनांक २७.०९.२०२२ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. सदर मा. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार
मा.राज्यपाल महोदय यांच्या स्तरावरुन तीनही विकास मंडळांचे पुनर्गठन करण्याच्या अनुषंगाने सत्वर कार्यवाही करण्याबाबत मा. गृहमंत्री, भारत सरकार यांना अर्ध शासकीय पत्राद्वारे वेळोवेळी विनंती करण्यात येत आहे . त्यानुषगाने अद्यापही विकास मंडळांना मुदतवाढ केंद्र शासनामार्फथ देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## परभणी शहरातील वसमत महामार्गावर हातगाड्याला आग लागून दोन सिलिंडरच्या स्फोट झाल्याबाबत

**(३) ५८२ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील वसमत महामार्गावर दिनांक १२ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री अचानक रस्त्यावरील एका हातगाड्याला आग लागून सदर आगीत दोन सिलिंडरच्या स्फोटामुळे शहरातील दोन किमी अंतरापर्यंतच्या नागरीकांना त्रास झाला व वीज पुरवठा खंडीत झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात सर्रासपणे चहा, पोहे, छोटे हॉटेल, खाद्यपदार्थ विक्रीच्या हातगाड्यांवर सिलिंडर ठेवले जात असून, अशा प्रकारचे छोटे-मोठे विक्री केंद्र उभारतांना त्यांच्याकडे अन्न सुरक्षा विभागाची परवानगी नसून याबाबत स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०४-०७-२०२५) :** (१) हो, हे खरे आहे.
परंतु, सदर घटना दिनांक१२.०१.२०२४ रोजी घडलेली नसून, सदरील घटना दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी घडलेली आहे.
(२) हात गाडे अथवा छोटे-मोठे हॉटेल व्यावसायीक यांना खाद्य पदार्थ विक्रीच्या अनुषंगाने पुरवठा विभागामार्फत परवानगी देण्यात येत नाही. तथापि, व्यावसायीक प्रयोजनाकरीता वापरावयाचे गॅस सिलेंडरबाबत जीवनावश्यक वस्तू

अधिनियम, १९५५ मधील तरतुदीनुसार स्पष्ट सुचना असुन, गैरवापर निदर्शनास आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(३) दिनांक १२.०१.२०२५ रोजी घडलेल्या घटनेबाबत प्रसारीत झालेल्या बातमीच्या अनुषंगाने घरगुती गॅसचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यात येतो किंवा कसे याबाबत चौकशी करण्याकरीता तहसीलदार यांना दिनांक १७.०१.२०२५ व १७.०२.२०२५ रोजीच्या पत्रकान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच सन २०२४ मध्ये परभणी जिल्ह्यातील गॅस एजन्सीची तपासणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक १८.१०.२०२३ रोजी आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत. घरगुती गॅसच्या अवैध वापराच्या अनुषंगाने दिनांक १६.०५.२०२५ रोजी गॅस एजन्सी व हॉटेल यांची तपासणी करून अहवाल सादर केला आहे. तपासणीमध्ये घरगुती गॅसचा अवैध वापर होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

दिनांक १२.०१.२०२५ रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने श्री. रवि बालासाहेब मोरे, रा.दत्तधाम परिसर वसमत रोड, परभणी यांच्या वडापाव गाडयाला अज्ञात व्यक्तीकडून आग लावून दिल्यामुळे गॅसचा स्फोट झाला होता. सदर घटनेमध्ये गाडाचालक यांच्या गाडयावर घरगुती गॅसचा वापर होत नसल्यामुळे संबधिताविरुध्द सदरील घटनेबाबत कोणतीही कार्यवाही या विभागाकडून करण्यात आली नसल्याचे तहसीलदार परभणी यांनी कळविले आहे. तथापि गाडाचालक यांनी आग लावणाऱ्या अज्ञात व्यक्तिविरुध्द वैयक्तीकरित्या गुन्हा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## शेंदवड-मांजरी ( ता. साक्री, जि. धुळे) तापी नदी ते पांझरा नदीच्या उगमापर्यंत सिंचन प्रकल्प राबविणेबाबत.

**(४) ७५८ (२८-०४-२०२५). श्रीमती मंजुळा गावित (साक्री) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंदवड-मांजरी (ता. साक्री, जि. धुळे) येथे पांझरा नदीचा उगम होऊन ही नदी शिंदखेडा तालुक्यातील मुडावद येथील प्राचिन तिर्थक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिर येथे तापी नदीस मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांझरा नदी ही बारमाही असून पांझरा नदीवर अनेक लहान मोठे धरणे / प्रकल्प आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साक्री विधानसभा मतदार संघामध्ये तापी नदी ते पांझरा नदीच्या उगमापर्यंत प्रकल्प राबविण्यात आल्यास साक्री तालुक्यात बारमाही पाण्याची उपलब्धता होऊन कृषी सिंचनासह पिण्याच्या पाण्याची सोय होणार असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी तापी नदी ते पांझरा नदीच्या उगमापर्यंत सिंचन प्रकल्प राबविण्याची मागणी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास उपमुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे

(२) अंशत: खरे आहे.

पांझरा ही बारमाही नदी नाही परंतु नदीवर जलसंदा विभागाच्या अखत्यारीतील २ मध्यम, १३ को.प. बंधारे व २९ फड / वळण बंधारे आहेत.

(३) होय,

कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांना स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकरी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांनी तपासणी करुन अहवाल सादर करणेबाबत क्षेत्रिय स्तरावर निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे रिंगरोडच्या कामासाठी ठेकेदार कंपन्यांकडून अंदाजित रकमेपेक्षा जास्त दराने निविदा काढल्याबाबत

**(५) ८३९ (०१-०५-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, रिंगरोड प्रकल्पासाठी जास्त दराने निविदा स्वीकारण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित नसुन त्रयस्थ संस्थांच्या शिफारशींचे पालन न केल्यामुळे खर्चात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिंगरोड प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी देखील आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिंगरोड प्रकल्पासाठी झालेल्या खर्चवाढीमुळे होणाऱ्या आर्थिक नियोजनबद्ध खर्च सुनिश्चित करण्यासाठी कोणती उपायोजना केली तसेच निविदा प्रक्रियेत आढळलेल्या तांत्रिक व प्रशासकीय त्रुटींची चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकल्पाकरिता दिनांक १४.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

## मुंबईतील धारावीच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या प्रलंबित कामाबाबत

**(६) ८६४ (२७-०४-२०२५). श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावीच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाची सदयस्थिती काय आहे,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम कोणत्या कंपनीला देण्यात आले आहे,

(३) असल्यास, धारावीचा पुनर्विकासास कधीपर्यत सुरुवात होणे अपेक्षित आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२५) :** (१) रेल भूमि विकास प्राधिकरण व धारावी पुनर्विकास प्रकल्प यांचे मधील दिनांक १८/१०/२०२२ रोजी झालेल्या करारातील अटी व शर्तीनुसार ६.२४ एकर जमिनीवर रेल्वे वसाहत, रेल्वेच्या सोईसुविधा इत्यादी रेल्वेस बांधून द्यावयाच्या आहेत. त्यानुसार रेल्वे वसाहतीकरीता बांधकामाचा प्रकल्प सुरू करण्यासाठी दिनांक १०/९/२०२४ रोजी नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड यांना इरादा पत्र (LOI) जारी करण्यात आले आहे. तसेच दिनांक १८/१०/२०२४ रोजी सदर प्रस्तावाच्या अभिन्यासास मंजूरी (Layout approval) देण्यात आली आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाने रेल्वेच्या सेवा निवासस्थानांच्या इमारतीच्या (टॉवर क्रमांक १, २, ३ व ४) बांधकाम नकाशांना दिनांक २४/११/२०२४ रोजी मंजूरी दिली असून सदर इमारतींच्या जोत्यापर्यंतच्या बांधकामास परवानगी (Plinth C.C.) देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने रेल्वेच्या जमीनीवर इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत दिनांक १८/०३/२०२४ पासुन सर्वेक्षणाचे काम सुरु झाले असून, ८५,३८७ झोपड्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, ९७,५५१ झोपड्यांवर नंबर टाकण्यात आले आहेत.

(२) धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी, गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १३/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अदानी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड यांची मुख्य भागीदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड ही विशेष हेतु कंपनी स्थापन केली आहे.
(३) धारावी पुनर्विकास प्रकल्पाने रेल्वेच्या सेवा निवास्थानाच्या इमारतीच्या (टॉवर क्रमांक १, २, ३ व ४) बांधकाम नकाशांना दिनांक २४/११/२०२४ रोजी मंजूरी दिली असून सदर इमारतींच्या जोत्यापर्यंतच्या बांधकामास परवानगी (Plinth C.C.) देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने रेल्वेच्या जमीनीवर इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील पावसाळ्यात जलतरणामुळे होणारी वाहतूक कोंडी

**(७) ९०४ (२९-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील निम्बाज नगर, एकता नगर, सिंहगड रस्ता व भागात पावसाळ्यात जलतरणामुळे होणारी वाहतूक कोंडी आणि जनजीवन विस्कळीत होण्याच्या समस्या निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलतरण टाळण्यासाठी पावसाळ्यापूर्वी सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता आणि देखभालीसाठी तसेच नदी पात्रामधील गाळ काढण्यासाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पावसाळयामध्ये पुणे शहरात पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार पावसाळा पूर्व कामाचे अंतर्गत कामे करुन घेण्यात येतात.
(३) पावसाळ्यामध्ये पुणे शहरात पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी नाला साफसफाई, पावसाळी गटार साफसफाई, ड्रेनेज लाईन साफसफाई, २४ तास नियंत्रण कक्ष, मशिनरी व लेबरची आवश्यकतेनुसार उपब्ध करुन देणे इत्यादी कामे करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई वांद्रे, निर्मलनगरमधील संक्रमण शिबिरात राहणाऱ्या कुटुंबांना ‘म्हाडा’ने घराबाहेर काढल्याबाबत

**(८) ९१५ (०१-०५-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे निर्मलनगरमधील संक्रमण शिबिरात राहणाऱ्या आणखी २० कुटुंबांनाही ‘म्हाडा’ने घराबाहेर काढल्याने ७० मराठी कुटुंबे ‘रस्त्यावर’ आल्याचे माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ‘म्हाडा’ने उच्च न्यायालयाच्या आदेशाचा धाक दाखवून संक्रमण शिबिरातील इमारत क्र. ९ आणि १० या दोन इमारतींमधील रहिवाशांना घराबाहेर काढण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या ४० वर्षांपासून राहत असलेल्या कायदेशीर रहिवाशांना कायमस्वरूपी हक्काचे घर नाकारून याठिकाणी संक्रमण शिबिरातील रहिवाशांना विकासकाच्या माध्यमातून २३ मजल्यांचा ट्रांझिस्ट कॅम्प बांधून राहण्यास जागा देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निर्मलनगरमधील इतर १६ इमारतींच्या डेव्हलपमेंटमध्ये रहिवाशांना ५५० चौरस फुटांचे घर देण्यात येणार

असून संक्रमण शिबिरातील हुसकावून लावलेल्या कुटुबाना घरे मिळून देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२५) :** (१) व (२) निर्मलनगर वांद्रे (पूर्व) येथील संक्रमण शिबीर याचा पुनर्विकास करावयाचा असल्याने संक्रमण शिबीरात वास्तव्यास असलेल्या गाळेधारकांना रितसर नोटीस देऊन तसेच सदर गाळेधारकांना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार विकासकांसोबत भाडेकरारनामा करणे अथवा म्हाडाच्या पवई, मानखुर्द येथील संक्रमण शिबीरातील गाळे घेण्यासंदर्भात मुभा दिलेली होती. तथापि, काही गाळेधारकांनी कुठलाही पर्याय न स्विकारता गाळे खाली करण्यास नकार दिला. त्यामुळे निष्कासन करते वेळी उक्त नमुद दोन्ही पर्याय त्यांच्यासमोर ठेऊन गाळेधारकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) व (४) मुंबई मंडळांर्तगत निर्मलनगर येथील मालकी हक्कावरील इमारतींबरोबर संक्रमण शिबीरातील इमारत क्र. ९ व १० यांचा पुनर्विकास होणार आहे. एकत्रित मोठ्या भुखंडाचा पुनर्विकास होणार असून त्यापैकी संक्रमण शिबीराच्या जागी पुनर्विकास झाल्यानंतर संक्रमण शिबीरातील पात्र रहिवाश्यांना तेथे निर्माण होणा-या संक्रमण शिबीरातील गाळे कायमस्वरुपी वितरीत करण्याविषयी म्हाड प्राधिकरणाने निर्णय घेतलेला आहे.
५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिकेतील नैसर्गिक नाल्यांवर बांधकामास परवानगी दिल्याबाबत

**(९) ९५३ (२९-०४-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिकेतील नैसर्गिक नाल्यांवर बांधकामास परवानगी दिल्याने नैसर्गिक नाले संपुष्टात येऊन दरवर्षी पावसाळ्यात महापुराचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार, नैसर्गिक नाल्यावर बांधकाम करण्यास परवानगी देण्याऱ्या बदलापूर नगर परिषदेच्या व उल्हासनगर महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने नैसर्गिक नाल्यालगत असलेल्या भूखंडावर बांधकाम परवानगी देतांना मोजणी नकाशात जी भूखंडाची हद्द दाखविली आहे त्याचआधारे बांधकाम परवानगी दिलेली आहे. मंजूर नकाशामध्ये मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र.३.१.१ (ii) नुसार जागेवरील तत्कालिन रुंदी ग्राहय धरुन नाल्याच्या संरक्षक भिंतीपासून ६.० मी.अंतर नकाशात दर्शवून बांधकाम परवानग्या देतांना त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

अंबरनाथ व बदलापूरच्या दिशेने आलेला नैसर्गिक नाला (वालधुनी नाला/नदी)उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातून कल्याण शहराच्या दिशेने जात असून महानगरपालिका परिक्षेत्रातील नाल्याची लांबी अंदाजे १२.६७ कि.मी.आहे. उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प क्र.२, ३, ४ व ५ मधील काही क्षेत्र नाल्यालगत असले तरी महानगरपालिकेने नाल्यावर बांधकामास परवानगी दिलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील कात्रप शिरगाव न्यू पनवेल हायवेवर बेकायदेशीपणे अवैध कामे सुरु असल्याबाबत

**(१०) ९५४ (२७-०४-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील कात्रप शिरगाव न्यू पनवेल हायवेवर बेकायदेशीपणे अनेक विक्रेते रस्त्यावर बसत असून रात्रीच्या वेळेत विदयुत व्यवस्था नसल्याने गर्दुले व मध्यप्राशन करणारे नागरिक यांच्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बेकायदेशीर पणे रस्त्यावर बसणाऱ्या खाद्य पदार्थ व इतर विक्रेते तसेच मद्यप्राशन करणाऱ्या गर्दुल्ल्यान्वर कोणती कारवाई केली तसेच विदयुत व्यवस्था करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील कात्रप शिरगाव न्यु पनवेल हायवेवर खाद्यपदार्थ व इतर विक्रेते बेकायदेशीरपणे बसत होते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने दिनांक २७ व २८ जानेवारी, २०२५ रोजी पहिल्या टप्प्यात न्यु पनवेल हायवेवरील मॅकडोनाल्ड जवळील चौकात अनधिकृतपणे बसणाऱ्या खाद्य पदार्थ व इतर विक्रेते यांचेवर कारवाई केली आहे. तसेच फुटपाथ व रस्त्यालगत होणाऱ्या अतिक्रमण यासह विविध नागरी समस्या सोडविण्यासाठी नगरपरिषदेने वॉर्डनिहाय पालक अधिकारी नेमले असून कात्रप, शिरगांव-न्यु पनवेल हायवेवर अतिक्रमण निर्मुलन मोहिम हाती घेऊन अनधिकृतपणे बसणाऱ्या खाद्य पदार्थ व इतर विक्रेते यांचेवर कारवाई करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

कात्रप, शिरगांव-न्यु पनवेल हायवेवर विद्युत व्यवस्था नसल्याने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेतून न्यु पनवेल रस्त्यावर विद्युत व्यवस्था करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आली असून प्राप्त निविदेमध्ये पात्र कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील जाहिरात कंपन्याकडून अनियमितता झाल्याबाबत

**(११) ९७७ (०१-०५-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील जाहिरात कंपन्याकडून अनियमितता झाल्याने जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांनी जाहिरात कंपनीवर कारवाई करण्याबाबतचे किवा सदर कंपन्यांचे ठेके रद्द करण्याबाबतचे आदेश नगरपरिषद प्रशासनाला दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार नगरपरिषद प्रशासनाने कोणकोणत्या जाहिरात कंपन्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील जाहिरात कंपनीवर नगरपरिषदेने कारवाई केली, ही वस्तूस्थिती आहे. तथापि, जाहिरात कंपनीवर कारवाई करण्याबाबत अथवा कंत्राट रद्द करण्याबाबत

जिल्हाधिकारी अथवा उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांनी नगरपरिषद प्रशासनाला कोणतेही आदेश दिलेले नाही.
(२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषदेने ठरवून दिलेल्या ठिकाणी जाहिरात फलक उभारणे आणि जाहिरात प्रसिध्द करुन जाहिरात कर वसुल करण्यासाठी ठेका पध्दतीने देण्याकरीता निविदा मागविण्यात आली होती. प्राप्त निविदेतील मे.इल्युमिनेट असोशिएटस यांचे निविदेस प्रशासकीय ठरावाव्दारे मंजूरी देण्यात आली असून ठेकेदारासोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला होता. तथापि करारनाम्यातील तरतूदींचा भंग केल्यामुळे ठेकेदाराचा ठेका नगरपरिषदेने दिनांक ०६/०६/२०२३ च्या आदेशान्वये रद्द केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील अनेक डी.पी.रस्त्यावर बांधकाम परवानग्या देण्यात आल्याबाबत

**(१२) ९८० (०१-०५-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
१. ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील अनेक डी.पी.रस्त्यावर बांधकाम परवानग्या देण्यात आल्याचे माहे मे, २०२४ वा त्यादरम्यान मध्ये निदर्शनास आले, खरे आहे काय,
२.असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
३.असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार डी.पी.रस्त्यावर बांधकाम परवानग्या देणाऱ्या तत्कालीन नगररचनाकार, शहर अभियंता व मुख्याधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
४. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील डी.पी. रस्त्यालगत एकूण ३ बांधकाम प्रस्तावांना माहे मे, २०२४ मध्ये परवानगी दिलेली आहे.
(२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतूदीनुसार बांधकाम प्रस्तावांना मंजूरी दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिका शाळांतील शिक्षकांच्या विविध समस्या प्रलंबित असल्याबाबत

**(१३) १०२६ (०१-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिका शाळांतील शिक्षकांच्या विविध समस्या प्रलंबित असल्याने शिक्षकाना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०२५ च्या वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर मनपा शाळांतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देणे, वाहतूक भत्ता, मुख्याध्यापकांची पदोन्नती, शिक्षकांना निवड श्रेणी लागू करणे अशा विविध मागण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने शिक्षकांच्या मागण्यांसदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही

(२) व (३) हे खरे नाही,
नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक ०३.११.२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये दिनांक ०१.०९.२०१९ पासून दिनांक ३१.१२.२०२० पर्यंतची सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यात आलेली आहे.

वित्त विभाग परिपत्रक ५८८/प्रलेविअ/२०२४ दिनांक २५.०९.२०२४ नुसार नोव्हेंबर २०२४ पासून महानगरपालिकेच्या शिक्षकांना वाहतूक भत्ता लागू करण्यात आलेला आहे.

तसेच, नागपूर महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या पदोन्नती पडताळणी समितीने दिनांक ०४.०३.२०२५ ला दिलेल्या मान्यतेनुसार प्राथमिक मुख्याध्यापक तसेच माध्यमिक/ प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आला आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील जेएनपीए बाधित प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याबाबत**

**(१४) १०३३ (०१-०५-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील सिडको व जेएनपीए अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्या बाबत नुकतीच बैठक घेतल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ४१ वर्षापासून जेएनपीए प्रकल्पग्रस्त १२००० शेतकऱ्यांचा साडेबारा टक्के विकसित भूखंड वाटपाचा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना या बैठकीत दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जेएनपीए बाधित प्रकल्पग्रस्तांच्या १९६ फाइल्स व भूखंड एकत्रीकरण करण्यासाठी पाठवण्यात आलेली सर्व प्रकरणे निकाली काढून प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टिने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०५-२०२५) :** (१), (२), (३) व (४) जेएनपीए प्रकल्पासाठी सिडकोने हस्तांतरित केलेल्या जमिनीच्या भूधारकांना १२.५% जमीन वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन निर्णय दिनांक १४.८.२०१४ अन्वये घेण्यात आला आहे. सन २०१६ ते २०१९ या कालावधीत जेएनपीएकडून प्रकल्पग्रस्तांच्या सिडकोस आजतागायत प्राप्त २१२ संचिकापैकी १९० संचिकामध्ये ५ संगणकीय सोडतीद्वारे एकूण १९३ भूखंड इरादीत करण्यात आले आहेत. उर्वरित २२ संचिकांच्या अनुषंगाने संगणकीय सोडतीद्वारे भूखंड इरादित करण्याचे सिडकोमार्फत प्रस्तावित आहे.

सदर इरादित केलेल्या भूखंडांबाबत कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी ग्रामपंचायतींमध्ये जाहिर प्रसिध्दी करुन दिनांक ०३.१०.२०२३ ते दिनांक ०५.१२.२०२३ या कालावधीत प्रकल्पग्रस्तांसाठी शिबीरे करण्यात आली आहे.

दरम्यान, जेएनपीए प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांच्या अनुषंगाने सिडको व जेएनपीएचे संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक ०९.१.२०२५ व दिनांक २१.१.२०२५ रोजी प्रकल्पग्रस्तांसोबत संयुक्त बैठक झाली आहे. सदर बैठकीतील चर्चेनुसार प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यानुसार भूखंड वाटप करतांना किमान क्षेत्र २००० चौ.मी. ची अट काढून निवाडा धारकांच्या पात्रतेनुसार आरेखन करणे, किमान ५०० चौ.मी. पात्रतेचे एकत्रिकरण करणे, शिल्लक भुधारकांची निवाडानिहाय पात्रतेनुसार नियोजन आराखड्यात बदल करणे इत्यादीबाबतचा प्रस्ताव सिडकोमार्फत जेएनपीए प्राधिकरणास दिनांक २९.१.२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे.

१२.५% योजनेंतर्गत जेएनपीए प्रकल्पग्रस्तांस २००० चौ.मी. पात्रतेकरीता (२.० चटई क्षेत्र निर्देशांक) इतक्या क्षेत्राच्या भूखंडाचे वाटप करण्याच्या वेगवेगळया कुटुंबातील निवाडाधारक सामंजस्याने एकत्रित येत नसल्याने तसेच कागदपत्रांची पुर्तता जसे न्यायालयीन वारस दाखले, प्रतिज्ञापत्रे, रहिवाशी दाखले, जाबजबाब इत्यादी पुर्तता होत नसल्याने विलंब होत आहे.

---

**हदगाव तालुक्यातील (जि.नांदेड) भारतीय स्टेट बँकेत केवायसी करण्यासाठी नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याबाबत**

**(१५) १२१४ (२८-०४-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव तालुक्यातील (जि.नांदेड) भारतीय स्टेट बँकेत शासनाच्या विविध योजनेसाठी वेळोवेळी बँकखाते केवायसी करण्याची आवश्यकता असतांना आठवड्यात केवळ ३ दिवस आणि दिवसाला केवळ ४० खातेदारांची केवायसी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बँकेच्या आडमुठी धोरणामुळे नागरिकांना गेल्या कांही दिवसांपासून केवायसी करण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरीकांचे विशेषत: महिलांचे बँक खाते केवायसी करण्यासाठी येणा-या अडचणी दूर करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२८-०५-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे.

हदगाव तालुक्यातील (जि. नांदेड) भारतीय स्टेट बँकेत माहे जानेवारी, २०२५ मध्ये केवायसी करण्यासाठी नागरीकांची गर्दी झाली होती हे खरे आहे.

(२) बँकेने सर्व ग्राहकांच्या सहकार्याने सदर प्रश्न निकाली काढला आहे.

(३) शासनाच्या विविध योजनांच्या अनुषंगाने केवायसी अद्यावत करण्यासाठी व केवायसी द्वारे निष्क्रीय खाती पुन्हा चालू करण्यासाठी ग्राहकांची मोठ्याप्रमाणात गर्दी झाली होती. याकरीता बँकेने अतिरिक्त काऊंटरची व्यवस्था केली. ग्राहकांना त्यांचे व्यवहार करताना संयम राखण्याची बँकेमार्फत विनंती करण्यात आली. महिला ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी महिला होमगार्डची बँक शाखेमार्फत व्यवस्था करण्यात आली. ग्राहकांना सुरळीतपणे सेवा देण्यासाठी स्टेट बँकेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी शाखेस भेट देऊन स्थानिक वडीलधाऱ्यांची आणि काही ग्राहकांची बैठक घेतली व त्यांना केवायसी प्रक्रीया व शाखेच्या मोठ्या ग्राहक संख्येबद्दल स्पष्टीकरण दिले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला महानगरपालिकेने मालमत्ता कर वाढविला असल्याबाबत**

**(१६) १५११ (०१-०५-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेने मालमत्ता टॅक्स वाढविला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टॅक्स वाढीमुळे त्याचा परिणाम विकास कामांवर होत असल्याने यासदर्भात सर्व नगरसेवकांच्या वतीने ठराव तयार करुन अदयापही टॅक्स कमी करण्यात आलेला नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार मालमत्ता टॅक्स कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.
अकोला महानगरपालिकेमार्फत माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान कोणतेही मालमत्ता कर वाढ किवा कमी करण्याबाबत कोणताही ठराव किवा आदेश पारित करण्यात आला नाही.
महानगरपालिकेमार्फत सन २०१७-१८ ते २०२१-२२ पर्यंत अकोला शहरातील संपूर्ण मालमत्तांचे सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकन करण्यात आले होते. सदर मुल्यांकनाविरोधात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र.४२/२०१८ दाखल करण्यात आली. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिनांक ०९.१०.२०१९ रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेले मुल्यांकन निरस्त करुन नव्याने एक वर्षात मुल्यांकनाची प्रक्रिया सुरु करणेबाबत निर्देश दिले होते. या निर्णयाविरुध्द महानगरपालिकेतर्फे मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली असून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे व कर वसुलीस मुभा दिली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही..

---

### राज्यातील वाढवण ते नाशिक हायस्पिड कनेक्टिव्हिटी सुविधा प्रकल्पाच्या गतिमान उभारणीबाबत

**(१७) १५५१ (२५-०४-२०२५). श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाढवण ते नाशिक हायस्पिड कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधा प्रकल्पाची गतिमान उभारणी तयार करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्देशानुसार प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शिवडी- न्हावा शेवा अटलसेतूवरील टोल कमी करण्याबाबत

**(१८) १५६९ (०१-०५-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी-न्हावाशेवा अटलसेतूवरुन सन २०२४ या वर्षात अपेक्षेपेक्षा ४२ टक्के कमी वाहतूक झाली असून दररोज सरासरी ३९ हजारांऐवजी अंदाजे २२ हजार वाहनांनी या सेतूचा वापर केला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रसिध्दी पत्रकातून समोर आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अटलसेतूसाठी आकारण्यात येणारा टोल जास्त असल्याने या सेतूवरुन प्रवासी प्रवास करण्यास टाळत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अटलसेतूवरील टोल कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासन व राज्य शासनामार्फत पथकर आकारणीसंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व धोरणांच्या आधारे पथकराच्या दरासंदर्भात अभ्यास करून वाहनधारकांना कमीत कमी रू.२५० इतका सवलतीच्या दरात प्रोत्साहनात्मक पथकर दर लागू केला आहे.
अटल सेतू वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर माहे जानेवारी, २०२४ ते माहे ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मासिक सरासरी वाहनसंख्या ६,५६,२६४ इतकी होती. तदनंतर मुंबईतील इतर टोलनाके (वाशी, ऐरोली, मुलुंड इ.) माहे ऑक्टोबर पासून टोलमुक्त करण्यात आले. तदनंतर देखील माहे नोव्हेंबर, २०२४ ते माहे जानेवारी, २०२५ पर्यंत अटल सेतूवरील मासिक सरासरी संख्या वाहनसंख्या ७,४२,१६६ इतकी असून अटल सेतूचा वापर करणाऱ्या वाहनांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचेच निदर्शनास येते. सबब, पथकराच्या दरामुळे अटल सेतूवरून प्रवास करण्यास प्रवाशांकडून टाळाटाळ होत असल्याची बाब दिसून येत नाही.
त्याचबरोबर सदर सेतूवरील वाहनांची संख्या वाढविण्याकरिता अटल सेतूच्या वाहतूक विकिरण व्यवस्थेचा (Traffic dispersal System) भाग म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे शिवडी-वरळी उन्नतमार्ग तसेच नवी मुंबईमध्ये चिर्ले ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग जोडमार्ग या प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई किनारी रस्ता ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गादरम्यान वेगवान दळणवळण शक्य होणार असल्याने अटल सेतूवरून प्रतिदिन प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्येत वाढ होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गेवराई (जि.बीड) येथील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची कामे सुरु झाली नसल्याबाबत

**(१९) १६४१ (२३-०४-२०२५). श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) येथील दुरवस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सन २०२४ च्या अर्थसंकल्पात वार्षिक देखभाल दुरुस्ती (AMC) अंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून रस्त्यांच्या) कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.१ व २, बीड यांनी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान पारीत केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची कामे कंत्राटदारांनी सुमारे ४२ % हून निचांकी दराने निविदा भरून घेतली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची कामे कार्यारंभ आदेशातील विहित मुदतीत पूर्ण सुरु करण्यात येत नसून काम न करताच केवळ कागदोपत्री देयक तयार करून या प्रकरणात गैरव्यवहार होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास स्मरणपत्राद्वारे अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, धाराशिव व संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदरची कामे दर्जेदार करण्यासाठी कोणती उपाययोजना केली तसेच स्पर्धात्मक निविदेत प्रमाणापेक्षा जास्तीच्या निचांकी दराने निविदा भरून प्रत्यक्ष काम न करणाऱ्या कंत्राटदारा विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२०-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सदर कामाच्या निविदेमध्ये स्पर्धात्मक देकार प्राप्त झाल्याने सदर कामांना कमी दराचे देकार प्राप्त झाले आहे
(३) होय, निवेदन प्राप्त आहे.

(४) सदर कामांचे कार्यारंभ अदेश दिनांक ०३/१०/२०२४ ते दिनांक १३/०१/२०२५ या कालावधी देण्यात आले असुन काम पुर्णत्व कालावधी कार्यारंभ आदेशापासून एक वर्षाचा आहे.

सदर कामे करारनाम्याच्या शर्तीप्रमाणे पुर्ण केल्यानंतरच सुरक्षा ठेव रक्कम कंत्राटदारास परत करण्याची तरतूद आहे. त्यानुषंगाने कार्यारंभ आदेश प्रदान करण्यापुर्वी निविदा शर्तीप्रमाणे विहित १० % पेक्षा कमी रकमेच्या देकार असलेल्या कामासाठी अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Performance Security) चा भरणा पात्र कंत्राटदाराकडून जमा करुन घेण्यात आली आहे.

सदरची कामे करारनाम्यातील तरतूदी व विनिर्दिष्ट मानके या प्रमाणे कार्यान्वित करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे खांडबारा (ता. नवापूर, जि.नंदुरबार) येथील मेडिकल स्टोअर्समध्ये नियमबाह्य औषध विक्री होत असल्याबाबत

**(२०) १६८१ (२८-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खांडबारा (ता. नवापूर, जि.नंदुरबार) येथील याहामोगी मेडिकल, न्यू याहा मेडिकल व देवमोगरा मेडिकल स्टोअर्स या तिन्ही स्टोअर्समध्ये नियमबाह्य औषधांचा साठा करून बेकायदेशिरपणे वितरण केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेडिकल स्टोअर्सवर प्रशिक्षित सेल्समन ऐवजी अप्रशिक्षित सेल्समन औषध-विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मेडीकल स्टोअर्सची शासनाने तपासणी केली आहे काय, त्यानुसार नियमबाह्य औषधांचा साठा करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (०२-०७-२०२५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर तिन्ही मेडिकल स्टोअर्सवर तपासणीवेळी रजिस्टर्ड फार्मासिस्ट उपस्थित होते.

(३) अन्न व औषध प्रशासनाद्वारे दिनांक ११.०१.२०२५ रोजी याहामोगी मेडिकल, न्यू याहा मेडिकल व देवमोगरा मेडिकल स्टोअर्स या तिन्ही मेडिकल स्टोअर्सची सखोल तपासणी केली आहे. सदर तपासणीमध्ये बेकायदेशीर साठा आढळून आला नाही. तथापि, तपासणीवेळी आढळून आलेल्या इतर त्रुटीनुसार पेढीस कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संबंधित पेढीनी आपला खुलासा/स्पष्टीकरण सहायक आयुक्त (औषधे), नंदुरबार कार्यालयास सादर केले आहेत. तसेच, औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार याहामोगी मेडिकल, न्यू याहा मेडिकल व देवमोगरा मेडिकल स्टोअर्स या तिन्ही मेडिकल स्टोअर्सचे औषध विक्री परवाने निलंबित केले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## केज (जि. बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणीमुळे कापूस विक्रीस येत असलेल्या अडचणीबाबत

**(२१) २३५९ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील कापूस खरेदी केंद्रावर भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय.) मार्फत कापूस खरेदी

सुरु असून पिक पेरा होत नसल्याने बऱ्याच शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तांत्रिक अडचणींमुळे कापूस पिकांची ऑनलाईन नोंद न झालेल्या शेतकऱ्यांना सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला पिक पेरा ग्राह्य धरून त्यांचा माल सी.सी.आय केंद्रावर खरेदी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उप महाव्यवस्थापक, भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय.), छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-०७-२०२५) :** (१) व (२) तांत्रिक कारणामुळे दिनांक ०९.०२.२०२५ रोजी सीसीआयचे कापूस खरेदीचे काम विस्कळीत झाले होते. त्याचे निराकरण करुन विस्कळीत झालेली खरेदी प्रक्रिया दिनांक २४.०२.२०२५ पासून सुरु करण्यात आली.

राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना किमान हमी दराचा लाभ मिळण्यासाठी शासन व सीसीआय यांच्या प्रक्रियेनुसार ई-पिक पहाणीवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार, सीसीआयने ई-पिक-पहाणी पोर्टलवर नोंदणी व कृषि उत्पन्न बाजार समितीने प्रमाणित केलेल्या शेतकऱ्यांकडून किमान हमी दराने कापूस खरेदी केला आहे.

केज तालुक्यातील शेतकऱ्यांकडून सीसीआयने ४९३३८ क्विंटल कापूस किमान हमी दराने खरेदी केला आहे.

ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली नाही त्यांच्यासाठी इतर कागदपत्रे स्वीकारण्याची स्थानिक प्रतिनिधींनी सीसीआयच्या संबंधित शाखेला विनंती केली होती.

(३) सी.सी.आय. यांची काही काळासाठी कापूस खरेदी बंद होणे, शेतकऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी व आगामी कापूस हंगामाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी व सीसीआयच्या अधिकाऱ्यांसमवेत दिनांक १७.०४.२०२५ रोजी बैठक संपन्न झाली आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

## भूम (जि.धाराशीव) तालूक्यात रस्तांच्या कामांच्या निविदा काढूनही अद्याप कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२२) ३०७२ (२८-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.धाराशीव) तालूक्यात वेगवेगळया ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मोठया प्रमाणात रस्त्यांची कामे सुरु असून काही कामांच्या निविदा काढून सुध्दा अद्याप कामे सुरु केलेली नसल्यामुळे रस्त्यांची कामे करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी यांना निवेदन करुन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूम तालूक्यातील रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने खराब असल्यामुळे अपघात होण्याच्या भितीने भूम एसटी आगाराने अनेक ठिकाणच्या एसटीच्या सेवा बंद केल्या आहेत त्यामुळे स्थानिक नागरीक आणि विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, भूम तालूक्यातील बंद असलेली रस्त्याची कामे तात्काळ सुरु करण्यांच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.

(२) हे खरे नाही.

परिवहन महामंडळाच्या बस सेवा सुरु आहेत.

(३) कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेली कामे करारनाम्यातील तरतूदीनूसार पूर्ण करणेचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग रस्ते बांधकामास विलंब होत असल्याबाबत.**

**(२३) ३१०७ (२८-०४-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील आष्टी ते सिरोंचा या राष्ट्रीय महामार्गाची कामे सबंधीत अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे मागील १० वर्षापासून प्रलंबित असल्याने या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे या महामार्गावर वाहतूक करणे अत्यंत कठीण झाले असून आतापर्यंत सुमारे २०० नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या कामात होणाऱ्या विलंबामुळे कामाच्या खर्चात कोटयवधी रुपयांची वाढ होवून शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०६-२०२५) :** (१) साकोली-वडसा-गडचिरोली-आष्टी अलापल्ली-सिरोंचा राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३-C हा राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाकडे असून आष्टी ते सिरोंचा रस्ता लांबी १३८ कि.मी मध्ये पांच भागांमध्ये कामे प्रगतीत आहेत.

| भाग | कार्यारंभ आदेश | सद्यस्थितीत |
|---|---|---|
| आष्टी ते लगाम (१७.०५ कि.मी.) | २०.१.२०२३ | काम पूर्ण |
| लगाम ते अल्लापल्ली (२८ कि.मी.) | ९.९.२०२४ | काम प्रगतीत (१४.५ टक्के) |
| अल्लापल्ली ते गुड्डीगुडम (१६ कि.मी.) | २३.११.२०२१ | काम प्रगतीत (२८.७५ टक्के ) |
| गुड्डीगुडम ते रेपनपल्ली (१९ कि.मी.) | २३.१२.२०२१ | काम प्रगतीत (५१.८५ टक्के ) |
| रेपनपल्ली सिरोंचा (५९ कि.मी.) | ०१.०६.२०२२ | काम प्रगतीत (३८.४ टक्के) |

आष्टी ते लगाम या १७.०५ किमी. रस्ते लांबी मध्ये काम पूर्ण झालेले असून त्याचप्रमाणे लगाम ते सिरोंचा या लांबीमध्ये उक्त नमूद कार्यारंभ दिनांका पासून विविध कंत्राट दारांना काम प्रदान करण्यात आले असून या भागांमध्ये वन्यजीव भ्रमणमार्गाची लांबी वगळता उर्वरित लांबीमध्ये रस्त्यांचे बांधकाम वेगवेगळया स्तरावर प्रगतीत असून रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे. वन्यजीव भ्रमणमार्गावरील लांबीत NBWL ची परवानगी प्राप्त झाल्यानंतर सुचविलेल्या उपाययोजनाप्रमाणे आवश्यक वित्तीय व तांत्रिक मंजूरीनंतर कामास सुरुवात करण्यात येईल.

(२) आष्टी ते सिरोंचा राष्ट्रीय महामार्ग ३५३-C रस्ते लांबी सुस्थितीत करण्यात आलेले असून रस्त्यावरून वाहतूक सुरळीत करण्यात आलेले आहे. वन्यजीव भ्रमण मार्ग प्रभावित लांबी मध्ये खड्डे भरणे व रस्त्याची डागडुजीकरून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्याची कार्यवाही प्रगतीत आहे तसेच उर्वरित लांबी मध्ये नियमित रस्ता बांधण्याचे काम प्रगतीत असून रस्ता वाहतूकीस योग्य ठेवण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही,

रस्त्याच्या कामात विलंबामुळे वाढ झालेली नसून शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.,

शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नसल्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) आष्टी ते सिरोंचा रस्त्याची लांबी संपूर्णपणे वन विभागाच्या हद्दीतून मार्गक्रमण करीत असल्यामुळे वन विभागाकडे मंजुरी करिता /परवानगीकरिता प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, मंजुरी प्राप्त झाल्यावर लवकरात लवकर काम पूर्ण करण्यात येईल.

---

**अलिबाग-वडखळ राष्ट्रीय महामार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत**

**(२४) ३३३२ (२८-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-वडखळ राष्ट्रीय महामार्गाच्या कामात संबंधित विभागाच्या दुर्लक्षेमुळे महामार्गाचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर मोठया प्रमाणात होणा-या वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन सदर महामार्गाचे रूंदीकरण व मजबुतीकरण करण्याची शासनाकडून मंजुरी मिळाली आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे रूंदीकरण व मजबुतीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ता राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या ५ वर्षापासून राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित न केल्यामुळे महामार्गाच्या रस्त्याच्या कामास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अलिबाग-वडखळ राष्ट्रीय महामार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याबाबत तसेच तातडीने महामार्गाचे काम सुरू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

वडखळ-अलिबाग हा पूर्वीचा राज्यमार्ग दिनांक ३ मार्च, २०१४ रोजीच्या भारतीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालय यांच्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६-अ असा घोषित करण्यात आला. दिनांक ०८.०२.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे वर्ग (Entrust) झाल्याने सदर महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून मुख्य व्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे सन-२०१७ मध्ये हस्तांतरित झाला. तद्नंतर दिनांक २०.०९.२०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वर्ग (Entrust) झाला आहे. अद्याप हस्तांतरण प्रक्रिया झालेली नसल्याने सदर महामार्गाचे देखभाल व दुरुस्ती भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(२) होय,

सदर रस्ता सद्यस्थितीत सुस्थितीत ठेवण्याकरिता कि.मी. २/५०० (धरमतर पूल जोड रस्ता) ते कि.मी. २२/२०० (अलिबाग-निलिमा हॉटेल-सेंट मेरी स्कूल) या लांबीतील अस्तित्वातील डांबरी रुंदीस मजबुतीकरण करणेचे काम केंद्र शासनाच्या भारतीय रस्ते व परिवहन राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली MORT&H कडून, सन २०२४-२५ च्या अर्थ संकल्पात सामाविष्ट करण्यात आले असून दिनांक २२.०१.२०२५ रोजी रु.३९.४० कोटी रक्कमेस प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे. कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून, ठेकेदार निश्चिती झाल्यावर ठेकेदारामार्फत सदर काम कार्यान्वीत करण्यात येणार आहे.

(३) होय,

सद्य:स्थितीत सदर रस्ता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पनवेल (NHAI) यांचे अख्यतारीत असून केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या दिनांक २०.०९.२०२४ अधिसूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) व (५) दिनांक २०.०९.२०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वर्ग (Entrust) झाला आहे. अद्याप हस्तांतरण प्रक्रिया झालेली नाही, सदर महामार्गाचे हस्तांतरण झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुढील आवश्यक कारवाई करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही..

---

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील बीएसएनएल कार्यालयाची भव्य इमारत गेल्या अनेक वर्षापासून विना वापर पडून असल्याबाबत

**(२५) ३४९७ (२३-०४-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील बीएसएनएल कार्यालयाची (टेलिफोन एक्चेंज) भव्य इमारत गेल्या २५ वर्षापासून विना वापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेली सदर इमारत पडून असल्याची कारणे काय आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील शासनाची इतर विविध कार्यालये हे भाड्याच्या जागेत सुरु आहेत तसेच बीएसएनएलचे सदर कार्यालय जव्हार येथे स्थलांतरीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने भाड्याच्या जागेवर कार्यरत असलेले इतर शासकीय कार्यालये बीएसएनएलच्या सदर इमारतीत स्थलांतरीत करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०८-०७-२०२५) :** (१) या विभागाशी संबंधीत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गाच्या कामांबाबत

**(२६) ३५८६ (३०-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील गंगाखेड-धारखेड -गोदावरी नदीवरील पूलाचे लोकार्पण, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक बी ५४८, देवेगाव फाटा ते इंजेगाव या रस्त्याचे भूमिपूजन केंद्रीय दळणवळण मंत्री यांच्या हस्ते सन २०२४ वा त्यादरम्यान करण्यात आले होते हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, देवगाव फाटा ते इंजेगाव या रस्त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, संबंधित रस्ता पूर्ण करण्याबाबत किती कालावधी लागणार असून सदरील रस्ता दर्जेदार व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) होय हे खरे आहे, परभणी जिल्ह्यातील राज्यमार्ग क्रमांक ४३४ व गोदावरी नदीवरील पुलाचे लोकार्पण, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ के वरील गंगाखेड ते किनगाव (लांबी ३३.५५४ कि. मी) व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी देवगाव फाटा ते इंजेगाव (लांबी ७०.९ कि. मी) या रस्त्याचे भूमिपूजन केंद्रीय दळणवळण मंत्री यांच्या हस्ते १० ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित ' करण्यात आले होते. परंतु, प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनानंतर राज्यात दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला त्यामुळे आयत्यावेळी लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रम रद्द करण्यात आले.

(२) देवगाव फाटा ते इंजेगाव (लांबी ७०.९० कि. मी) या रस्त्याच्या निविदे मध्ये आर. बी. घोडके इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी पात्र ठरली आहे व Letter of Appointment (कार्यारंभ आदेश) देण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) देवगाव फाटा ते इंजेगाव (लांबी ७०.९० कि. मी) रस्ता पूर्ण करण्याकरिता Letter of Appointment (कार्यारंभ आदेश) पासून २ वर्षाचा कालावधी लागणार आहे. रस्ता दर्जेदार व्हावा यासाठी रस्त्याचे बांधकाम MORTH, IRC, Specifications मधील तरतुदीनुसार करण्यात येऊन कामाची गुणवत्ता राखण्यात येईल. उक्त रस्त्याच्या बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यासोबत स्वतंत्र तांत्रिक सल्लागार (Authority Engineer) यांच्या नेमणुकीसाठी निविद प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी पतसंस्थांद्वारे ग्राहकांची फसवणूक व संरक्षणासाठी करण्यात येणारी शासनाची उपाययोजनाबाबत**

**(२७) ३५९८ (०५-०५-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी पतपेढ्यांतून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असल्याने सर्वंकष धोरण राबविण्याबाबतची मागणी राज्यभरातून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकाच्या संरक्षणासाठी सर्वंकष धोरण राबवून त्यांचा पैसा सुरक्षित राहील याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मराठवाड्यातील पतसंस्था व पतपेढ्यांनी ग्राहकांची केलेली फसवणूकीबाबतीत पतसंस्थांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे तसेच ग्राहकांची रक्कम परत मिळावी यासाठी शासन स्तरावरून कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,

४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (२६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरकृषी / पगारदार सहकारी पतसंस्थांचे ठेवीदारांचे संरक्षण, पतसंस्थांमधील ठेवी संरक्षित करणे व आर्थिक शिस्त आणण्यासाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये बिगर कृषि सहकारी पतसंस्थांसाठी प्रकरण क्र.११-१अ, दिनांक ०७/०९/२०१७ रोजीचे शासन राजपत्राद्वारे समाविष्ट करण्यात आले आहे. शासन राजपत्राद्वारे सदरचे प्रकरण दिनांक २२/०२/२०१९ पासून अंमलात आले.

पतसंस्था नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व शाखा विस्तार, ठेवी व कर्जाचे व्याजदर, वैयक्तिक व समुह कर्ज मर्यादा, केवायसी, रोखता निधीचे प्रमाण, तरलता निधीचे प्रमाण, सी.आर.ए.आर., अनुत्पादक जिंदगी (एनपीए), सामोपचार परतफेड योजना, इ. बाबत शासन/सहकार आयुक्त कार्यालय / नियामक मंडळाने वेळोवेळी आर्थिक निकषांबाबत मार्गदर्शक

सुचना / परिपत्रके निर्गमित केली आहेत.
(३) मराठवाडयातील अपहार व गैरव्यवहार झालेल्या २० पतसंस्थांबाबत पोलिस स्टेशन येथे गुन्हे दाखल करणे, कलम ८३ व ८८ अन्वये चौकशी करणे, चाचणी लेखापरिक्षण करणे, प्रशासक नियुक्ती, इ. कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचोरा तारखेडा (जि. जळगाव) तालुक्यातील रस्ता प्रजिमा ३७ या रस्त्यासाठी रेल्वे लगतची जमिन अधिग्रहण केली असल्याबाबत**

**(२८) ४१५० (३०-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील पाचोरा – तारखेडा तालुक्यातील रस्ता प्रजिमा ३७ किमी २९/९०० ते ३३/४०० या रस्त्यासाठी रेल्वे लगतची जमिन अधिग्रहण करुन पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०७-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौ.पाचोरा,जारगाव, चिंचखेडा खु, अंतुर्ली बु. प्र. पा. ता.पाचोरा जि.जळगांव येथील हे. १०.५६ आर.एवढया क्षेत्रासाठी भुसंपादनाचा प्रस्ताव क्रमांक ८५/२०२४ अन्वये जिल्हाधिकारी, जळगांव यांनी भुसंपादनासाठी उपविभागीय अधिकारी, पाचोरा यांना दिनांक ०९.०१.२०२५ च्या पत्रान्वये प्राधिकृत केले असून, भुसंपादनाची कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील हिंगोली-वाशिम या राष्ट्रीय महामार्गावर वळण मार्ग निर्माण करण्याबाबत.**

**(२९) ४३०८ (३०-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील हिंगोली-वाशिम या १६१ क्रमांकाच्या राष्ट्रीय महामार्गावरील अंडरपास पासून ३.५० कि.मी.अंतरावर असलेल्या वळणामुळे वाहन चालकांची दिशाभूल होऊन त्यांचा समभ्रम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन वाशिम अंडरपासजवळ साखळी क्रमांक ८५ अधिक ६०० मध्ये नजिकच्या अंतरात योग्य ठिकाणी वळण निर्माण करुन तेथे मोठया आकाराचे साईन बोर्ड लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१)अंशतः खरे आहे.

नांदेड-हिंगोली-वाशिम-अकोला हा राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ हा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे आहे.

वाशिम अंडरपासजवळ औद्योगिक वसाहत असल्यामुळे मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूस एकूण ३.२२ कि.मी.सर्व्हिस रस्ता देण्यात आलेला आहे. कुठल्याही प्रकारचा अपघात होऊ नये याकरीता मुख्य रस्ता व सर्व्हिस रस्ता यामध्ये Median Opening दिलेली नाही. तसेच हिंगोली कडून येणाऱ्या वाहनांना वाशिम कडे जाण्यासाठी Underpass चालू होण्याच्या आधी वाहनांना सर्व्हिस रस्त्यावर वळविले आहे. तसेच मोठे दिशादर्शक फलक सुद्धा लावण्यात आलेले आहे. त्यामुळे दिशाभुल होण्याचा प्रश्न नाही.

(२) वाशिमला जाण्यासाठी वाहन चालकाची दिशाभूल होत असल्याच्या तक्रारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना आलेल्या असल्यामुळे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने कंत्राटदाराला मुख्य रस्ता आणि सर्व्हिस रस्ता यामध्ये साखळी क्रमांक ८५.६५० वर Median Opening देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदर प्रस्तावित Median Opening नजिकच्या अंडरपास पासून ९८० मी. अंतरावर देण्याचे प्रस्तावित आहे. त्या अंतर्गत योग्य ते दिशादर्शक फलकही लावण्यात येईल. सदरील काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम मालेगाव महामार्गावर लालमाती जवळ खोदलेल्या रस्त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय होत असल्याबाबत.**

**(३०) ४३१७ (३०-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील वाशिम -मालेगाव मार्गावर लालमाती जवळ एका बाजूने अर्धवट रस्ता खोदल्यामुळे वाहन चालकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरुन जड वाहनांची मोठया संख्येने सतत वर्दळ असून रात्रीच्या वेळी दुचाकी चालक, ऑटो व इतर छोटया वाहनांची गैरसोय होत असून तेथील रस्ता खोदून ठेवला असल्यामुळे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

नांदेड-हिंगोली-वाशिम-अकोला हा राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ हा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने वाशिम शहराचे One Time Improvement मध्ये २ lane with Paved Shoulder चे काम हाती घेतलेले आहे. सदर बांधकाम कंत्राटदाराने चालू केले असता स्थानिक प्रतिनिधी व इतरांनी वाशिम शहरातील रस्त्याचे २ lane with Paved Shoulder ऐवजी चौपदरीकरण करण्यात यावे, अन्यथा प्रस्तावित असलेले काम करू नये असे सांगितले. त्यामुळे NHAI च्या कंत्राटदाराला हे काम थांबवावे लागले.

(२) हे खरे नाही.

कंत्राटदाराने १० किमी पैकी फक्त २०० मीटर रस्त्याची एक बाजू खोदलेली आहे आणि दुसरी बाजू ही वाहतूकीस जाण्या योग्य आहे. तसेच सुरक्षा नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे कुठलेही प्रकारचे अपघात या ठिकाणी निदर्शनास आलेले नाहीत.

(३) व (४) स्थानिक प्रतिनिधीच्या मागणीनुसार नविन प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करणे सुरू आहे. सदर अंदाजपत्रकाला मंजूरी मिळताच पुढील काम हे लवकरात लवकर सुरू करण्यात येईल.

---

**बीड जिल्हयातील मांजरसुंबा, लिंबागणेश, पाटोदा या रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(३१) ४५१३ (२९-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील मतदार संघामध्ये असलेल्या मांजरसुंबा, लिंबागणेश, पाटोदा रस्त्याचे काम सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोरगाव ग्रामपंचायत अंतर्गत जाधववस्तीत याठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम करण्याची बाब अंदाजपत्रकात समाविष्ट असतांना नालीचे बांधकाम न केल्यामुळे पावसाचे पाणी आजूबाजूच्या शेतात जाऊन शेतीच्या पिकाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या दोन्ही बाजूचे नालीचे बांधकाम त्वरीत करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०३-०७-२०२५) :** (१) मांजरसुंबा ते चुंबळी फाटा राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी रस्त्याचे काम दिनांक २६.०२.२०२२ रोजी पुर्ण करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही,

(३) सदर ठिकाणी खुल्या नालीची (Earthen Drain) करारामध्ये तरतूद असल्यामुळे त्या ठिकाणी खुल्या नालीचे काम पुर्ण केले आहे. तसेच पाण्याचा निचरा करण्यात आला असल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयात आरटीई अंतर्गत अतिरिक्त अर्ज प्राप्त झाल्याबाबत**

**(३२) ४६०१ (०५-०५-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील शाळांमध्ये आरटीई अंतर्गत ७ हजार जागा असताना प्रवेशासाठी ३० हजार अर्ज प्राप्त झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्टयादुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०३-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींनुसार खाजगी विनाअनुदानित शाळांमधील वंचित व दुर्बल घटकांतील मुला/मुलींकरीता प्रवेश स्तरावर २५ टक्के आरक्षित असणाऱ्या जागांवर प्रवेश देण्यात येतो. त्यानुसार, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात नागपूर जिल्ह्यात १०३९५ बालकांची निवड झाली आहे. यापैकी ६०१८ बालकांचे प्रवेश पुर्ण झाले असून प्रतिक्षा यादीतील बालकांची प्रवेश प्रक्रिया करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणातील काजू प्रक्रिया सहकारी संस्थेत शिफारशी नुसार अंमलबजावणी करणेबाबत**

**(३३) ४६४३ (०५-०५-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या क्रमांक काविधो – २०२०/प्र.क्र.१२०/९ ए दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयामधील शिफारस क्रमांक १० अन्वये कोकणातील काजू प्रक्रिया सहकारी संस्थाबाबत १ ते ६ शिफारशी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सहकार,पणन विभागाने प्रस्ताव तयार केला असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०८-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कृषि विभागाच्या दिनांक १६.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील काजू प्रक्रिया सहकारी संस्थांबाबत केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने, पणन संचालनालयाकडून प्राप्त प्रस्तावानुसार एकूण २२ काजू प्रक्रिया सहकारी संस्थांना दिनांक ३१.०३.२०२३ अखेर रा.स.वि.नि. कर्ज रु.४५३५.६८ लाख, रा.स.वि.नि. भागभांडवल रु.१६२७.५५ लाख व शासकीय भागभांडवल रु.९७४.४६ लाख असे एकूण रु.७१३७.६९ लाख वितरीत केले आहे. शासन निर्णयातील शिफारशीनुसार रु.४५३५.६८ लाख कर्जावरील रु.६५९५.५९ लाख व्याज माफ करणे, कर्जातील ७५ टक्के रक्कम भागभांडवलात वर्ग करणे यासह इतर शिफारशींचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला होता, सदर प्रस्तावासंदर्भात नियोजन व वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत.

(३) उपरोक्त प्रस्तावासंदर्भात नियोजन व वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पणन संचालनालयाचा प्रस्ताव दिनांक २६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला असून, तो विचाराधीन आहे.

(४) उपरोक्त प्रस्तावासंदर्भात नियोजन व वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये काही मुद्दे संस्था संबंधित होते. संबंधित संस्थाकडून त्यांची माहिती विहित वेळेत प्राप्त न झाल्यामुळे विलंब झालेला आहे.

---

## अकोला शहरातून वाहणा-या विट्टपा, मोर्णा नदीसाठी अन्यायकारक पध्दतीने आखण्यात आलेली निळी व लाल रेषा रद्द करण्याबाबत

**(३४) ४७३८ (२९-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातून वाहणा-या विट्टपा, मोर्णा नदीसाठी अन्यायकारक पध्दतीने आखण्यात आलेली निळी व लाल रेषा रदद करुन पुनर्रचनेच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनाक १० जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने विट्टपा, मोर्णा नदीसाठी अन्यायकारक पध्दतीने आखण्यात आलेली निळी व लाल रेषा रदद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-०७-२०२५) :** (१) होय.

अकोला शहरातून वाहणाऱ्या विद्रुपा, मोर्णा नदीसाठी आखण्यात आलेली निळी व लाल पूररेषा रद्द करुन पुनर्रचनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक १० जुलै, २०२४ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती

विभाग यांना अहवाल सादर केला आहे.
(२) सदर प्रकरणी जलसंपदा विभागाच्या दिनांक १०/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अकोला शहरातून वाहणाऱ्या मोर्णा व विद्रुपा नदीच्या संदर्भात प्रादेशिक कार्यालय (विशेष प्रकल्प), अमरावती यांच्या सप्टेंबर, २०२३ मध्ये प्रकाशित केलेल्या लाल व निळया पूररेषेची पडताळणी करेपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या दिनांक २२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अकोला शहरातून वाहणाऱ्या विद्रुपा व मोर्णा या नद्यांच्या पूररेषेची पडताळणी आय. आय. टी, मुंबई या नामांकित त्रयस्थ संस्थेकडून करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरुन करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील शेगांव -अकोला मार्ग अपूर्णावस्थेत असल्याबाबत.**

**(३५) ४७४० (२९-०४-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील शेगांव मार्गाचे गेल्या सात-आठ वर्षापूर्वी काम सुरु करुनही अदयाप अकोला रेल्वे गेट उड्डाणपुलापासून पारस रेल्वे गेटपर्यतचा रस्ता अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारस रेल्वे गेटपासून औष्णिक वीज निर्मीती केंद्रापर्यतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकोला-शेगाव रस्ता अर्धवट स्थितीत असल्याने अपघात होऊन अनेक नागरिकांना गंभीर दुखापती झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संत गजानन महाराज संस्थानचा पालखी सोहळा दरवर्षी आषाढी एकादशीला शेगाव अकोलामार्गे विठोबारायांच्या दर्शनासाठी येत असून वारक-यांची सुरक्षितता लक्षात घेऊन रस्त्याचे काम जलद गतीने सुरु करुन रस्त्यांच्या कामास विलंब करणाऱ्या संबंधित ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) अकोला जिल्ह्यातील शेगांव अकोला रेल्वे गेट उड्डाणपुलापासून पारस रेल्वे गेटपर्यतच्या रस्त्याचे काम राज्य मार्ग २७३ वरील असून, त्याची लांबी १५.९० कि.मी आहे. त्यापैकी १५,०० कि.मी. डांबरीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरीत लांबीचे काम प्रगतीत असून, सदर रस्त्यावरुन वाहतूक सुरु आहे. दिनांक ३१.०१.२०२५ रोजी दै. लोकमत या वृत्तपत्रात रस्ता अपूर्ण अवस्थेत असल्याची बातमी प्रसिद्ध झालेली आहे.
(२) पारस रेल्वे गेटपासून औष्णिक वीज निर्मीती केंद्राचा रस्त्याची लांबी २.९०० कि.मी असून त्यापैकी १.०५० कि.मी लांबीत डांबरी करणाचे काम पूर्ण झाले असून, पुढील उर्वरीत १.८५० कि.मी लांबीत मुरुम व खडीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(३) अकोला-शेगाव रस्तावर झालेले अपघात हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे झाले असल्याची नोंद आहे. सदर रस्त्यावर रस्ता सुरक्षिततेच्या अनुषंगाने वेळोवेळी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(४) (५) सदर प्रकल्पात काही भागात शेतकऱ्यांच्या हरकती, वनजमीन परवानगी, वीज वाहिन्या, पाणीपुरवठा वाहीन्या स्थलांतर, अतिक्रमण, अतिवृष्टी, अतिक्रमण, भूसंपादन व न्यायालयीन प्रक्रिया यांसारख्या विविध कारणांमुळे कामाला विलंब झाला आहे. वरील विलंबास कंत्राटदार जबाबदार नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.

---

**यवतमाळ शहरातील बसस्थानक चौक ते वनवासी मारोती रस्ताच्या कामात त्रुटी असल्याबाबत**

**(३६) ४७७६ (०१-०५-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरातील बसस्थानक चौक ते वनवासी मारोती चौपदारी रस्त्याचे काम सन २०१७-१८ मध्ये सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु रस्तास ३४ कोटी ५६ लाख रुपयांच्या खर्च करण्यात येऊन देखील रस्ताच्या कामात अनेक त्रुटी असल्याचा अहवाल गुण नियंत्रक पथकाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने जबाबदार अधिकारी - कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०६-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामामधील दक्षता व गुणनियंत्रण पथकाने काढलेल्या त्रुटींचे निराकरण कंत्राटदाराच्या खर्चातून करुन घेण्यात आले आहे.

(३) याबाबत शासनस्तरावर त्रिसदस्यीय सदस्य समिती नेमून त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीने शासनास सादर केलेला असून याबाबत शासनाचे काहीही आर्थिक नुकसान न झाल्याचे अहवालामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. चौकशीमध्ये काहीही निष्पन्न न झाल्यामुळे व कामाची गुणवत्ता अत्यंत चांगली असल्याचे VNIT नागपूर या तांत्रिक संस्थेने अहवालामध्ये नमूद केले असल्यामुळे अधिकारी व कंत्राटदारावर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही..

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कराड येथे कृष्णा नदीलगत स्वतंत्र नेकलेस रोड उभारण्याबाबत**

**(३७) ४८७४ (२९-०४-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे - बेंगलोर महामार्गावरुन कराड येथून सांगली जिल्ह्यातील विटा गावाकडे जाणारी सर्व वाहने कराड शहरातून पुढे जात नेहमी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर पर्याय म्हणून कराड शहरातून विट्याकडे जाणाऱ्या वाहनांची वाहतूक, कराड येथील पंकज हॉटेलजवळून थेट हायवेवरून विट्याला जाणाऱ्या रस्त्याकडे वळविल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी कराड येथील पंकज हॉटेलजवळून थेट हायवेवरून कृष्णा नदीला लागून स्वतंत्र 'नेकलेस रोड' उभारल्यास शहरातील वाहतुकीचा ताण कमी होऊन शहराच्या सौंदर्यात भर पडून कराड शहराच्या पर्यटनाला चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा नेकलेस स्वरुपाचा रस्ता स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळा जवळून जाणार असून त्यामुळे या स्मृतीस्थळाचा विकासही करणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०३-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे
(३) होय, हे खरे आहे
(४) होय, हे खरे आहे
(५) कृष्णा नदीला लागून स्वतंत्र नेकलेस रोड व शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडण्यासाठी स्व.यशवंतराव चव्हाण स्मृतिस्थळाचे सुशोभिकरणाच्या कामाचे सर्वेक्षण करुन आराखडा व प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. सदरचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**नागभीड (जि.चंद्रपूर) येथील कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागात होत असलेला गैरव्यवहार**

**(३८) ४९१२ (०१-०५-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड (जि.चंद्रपूर) येथील कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाचे महत्वपुर्ण काम आणि आर्थिक व्यवहाराशी निगडीत टेंडर क्लर्क हा टेबल अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर या कार्यालयात ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त टेबलची जबाबदारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या व काही कंत्राटदाराच्या संगनमताने गेल्या आठ वर्षापासन सेवानिवृत्त झालेले श्री.अंकलवार यांच्याकडे नियमबाहयरित्या देण्यात आले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्थिक हित असलेल्या या महत्वपुर्ण टेबलकडे निविदा प्रकिया राबविणे, कंत्राटदाराची देयके अदा करणे यासह अनेक महत्वाचे कामे असल्याने गेल्या अनेक वर्षापासून मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले असून देखील अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या सेवानिवृत्त टेंडर क्लर्क यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही,
(२) निविदा शाखेचा संपूर्ण कार्यभार अतिरिक्त स्वरुपात दिनांक १७.०८.२०२२ पासून श्री. व्हि. एच. बोरकर, वरिष्ठ लिपिक यांचेकडे व दिनांक २५.०७.२०२३ पासून श्री.आर. पी. सानप, कनिष्ठ लिपिक यांना या सदर विभागातील निविदा शाखेचा संपूर्ण कार्यभार सोपविण्यांत आलेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर - बुलढाणा - चिखली मार्गाचे चौपादरीकरणाचे काम सुरु करण्याबाबत.**

**(३९) ४९९३ (२९-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर - बुलढाणा - चिखली मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाचे मंत्री केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि जहाजबांधणी यांनी माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास उदघाटन करुनही अदयाप कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित असल्यामुळे या परिसरातील औद्योगिक वसाहती यांचा

विस्तार व विकास पूर्णपणे प्रलंबित असून परिणामी येथील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात अनेक प्रकारच्या अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही. मा. केंद्रीय मंत्री यांनी दिनांक १०/०६/२०२३ रोजी खामगाव येथील झालेल्या - सभेत सदर रस्ता अद्यापपर्यंत सा.बां. विभाग, बुलढाणा यांचेकडे असुन पथकर वसुली सुरु असल्याने महाराष्ट्र शासनाने जुन्या कंत्राटदाराचे दायीत्व संपुष्टात आणावे व चौपदरीकरणासाठी लागणारी लांबी राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरीत करावी, अशी घोषणा करण्यात आली होती. शासनामार्फत प्रकल्प बाय बँक किंमत व उद्योजकांचे दावे अंतिम करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रस्तुत रस्त्यावर अद्याप राज्यशासनामार्फत पथकर वसुली सुरु असल्याने प्रकल्पाची Buy Back किंमत निश्चित करून Buy Back किंमत अदा करून प्रकल्प हाती घेण्याबाबत मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग, मुंबई (MoRTH) यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

---

## पुणे शहरातील सहकारी सोसायट्यांचे मानवी अभिहस्तांतरण करणे प्रलंबित असल्याबाबत

**(४०) ५०५९ (०१-०५-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात २२३२७ सोसायटी असून त्यातील शासकीय जागेवर २०१५ संस्था असून त्यांना डिंम्ड कन्व्हेयन्स करण्याची गरज नसून यातील काही विकासकांनी स्वतःहून ३ हजार ७५ सोसायटीचे डिम्ड कन्व्हेयन्स करून दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित १२,४३० सोसायट्यांचे माहे मार्च, २०२३ वा त्यादरम्यान अखेर पर्यंत डिम्ड कन्व्हेयन्स करून देणे विकासकांना बंधनकारक असताना अद्याप पर्यंत करण्यात आले नसल्याचे दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित सहकारी संस्थांना डिंम्ड कन्व्हेयन्स करून देण्याची आवश्यकता असतानाही अनेक विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी बिल्डरांकडून प्रलंबित असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानवी अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) करून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाबासाहेब पाटील (०७-०७-२०२५) :** (१) होय, पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे कार्यक्षेत्रामध्ये माहे मार्च,२०२४ अखेर एकूण २२,३२७ सहकारी गृहरचना संस्था नोंदणीकृत झाल्या असून त्यापैकी शासकीय जमिन /भुखंडावरील एकूण २०१५ सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत आहेत. तर विकासकांनी मार्च, २०२४ अखेर ३०७५ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे हस्तांतरण करुन दिले आहे.
(२) मार्च, २०२४ अखेर जमिनीचे हस्तांतरण न झालेल्या १२,४३० संस्था पैकी सन २०२३-२०२४ मध्ये एकूण ६०१ संस्थेचे मानिव अभिहस्तांतरण करण्यात आले आहे. तसेच ०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ अखेर ५०१ संस्थांचे मानिव अभिहस्तांतरण करण्यात आले आहे व सद्य:स्थितीत ३६७ प्रकरण जिल्हा उप- निबंधक, पुणे शहर, यांचेकडे दाखल असून त्यांची सुनावणी प्रक्रिया सुरु आहे.
(३), (४) विकासकाच्या सहकार्याशिवाय मानीव अभिहस्तांतरण करण्याबाबत मोफा कायदा १९६३ च्या कलम ११ मध्ये तरतूद आहे. याबाबत सविस्तर कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक २२.०६.२०१८ मध्ये नमूद करण्यात आली आहे .

त्यानुसार गृहनिर्माण संस्था कार्यवाही करू शकतात. तसेच सहकार आयुक्त यांनी दिनांक ०४.०४.२०२२ च्या पत्रान्वये गृहनिर्माण संस्था नोंदणीवेळी मानीव अभिहस्तांतरणाची कागदपत्रे जमा करून घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
प्रश्न उदभवत नाही.

---

## मांढळ-खेंडा (जि.नागपूर) येथील रस्त्याची झालेली दूरवस्था

**(४१) ५१८० (२९-०४-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील मांढळ-खेंडा तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्याचे काम कंत्राटदाराने पुर्ण न करता सोडून दिल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.
नागपूर जिल्ह्यातील मांढळ ते खेंडा हा कुही तालुक्यातील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील प्रजिमा-११८ दर्जाचा रस्ता आहे. या रस्त्याची एकूण लांबी १३.५ कि.मी. आहे. सदरहू रस्त्यावर सुधारणेचे व नुतनीकरणाचे काम मंजूर नसल्यामुळे कंत्राटदार काम अर्धवट सोडून पळून जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सदरहू रस्त्यावर वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम अंतर्गत रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवून रस्ता सुस्थितीत व वाहतुकीयोग्य ठेवण्याचे काम करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही..

---

## राज्यात ॲग्रो लॉजिस्टिक हब उभारण्यात येत असल्याबाबत

**(४२) ५६२९ (२७-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतमाल प्रक्रिया उद्योगाला चालना देऊन निर्यात वाढीसाठी ॲग्रो लॉजिस्टिक हब उभारण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ॲग्रो लॉजिस्टिक हब हे कोणत्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन याकरिता निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-०७-२०२५) :** (१) होय.
(२), (३) व (४)
समृध्दी महामार्गालगत ॲग्रो लॉजिस्टिक हब प्रकल्प उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**पालघर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या गैरव्यवहाराबाबत**

**(४३) ५७६८ (०१-०५-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सचिन पाटील हे नाशिक येथे उपअभियंता म्हणून कार्यरत असतांना त्यांच्याविरुध्द सरकारवाडा पोलीस स्थानक, नाशिक शहर येथे गु. र. क्र.३५६/२०१७ दाखल करण्यात आला असून अभियोगाच्या प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती श्री. सचिन पाटील, उप अभियंता यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास परवानगी नाकारण्याचा निर्णय सक्षम प्राधिकारी यांनी घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाच घेण्याच्या गुन्ह्यामध्ये अडकलेल्या श्री. सचिन पाटील यांना राजकीय वरदहस्ताने पदोन्नती मिळाली असून त्यांची कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर येथे देखील राजकीय वरदहस्ताने नियुक्ती झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या विभागांतर्गत असलेल्या कामांना तांत्रिक मान्यता देण्यासाठी प्रत्येक कन्स्ट्रक्शन कंपनीकडे श्री. सचिन पाटील हे प्रशासकीय मान्यतेच्या एक टक्के रकमेची मागणी करत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, तांत्रिक मान्यता देण्या बरोबरच कन्स्ट्रक्शन कंपन्यांना दर्जेदार कामे केली असतांना देयके अदा करते वेळेस पुन्हा १ टक्का रकमेची मागणी कार्यकारी अभियंता करीत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधी यांच्या कडून दिनांक ०६.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांच्याकडे चौकशी करीता अहवाल पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहु अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग पालघरच्या कार्यकारी अभियंत्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०६-२०२५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) अद्याप अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) होय, अशी तक्रार प्राप्त आहे.

(५) लोक प्रतिनिधी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(६) अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

---

**मानोरा तालुक्यातील बेलोरा गावातील नदी तीरावरील पुर संरक्षण भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४४) ६०८० (०१-०५-२०२५). श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग आर्णि - अकोला या रस्त्यावरील बेलोरा गावावरून वाहणाऱ्या खोराडी नदीच्या जलप्रवाहामुळे अनेक वेळा महापुराचे पाणी गावात घुसून गावातील शेतीचा मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने लक्षावधी रुपये खर्च करून या नदी तीरावर पूर प्रतिबंधक भिंतीची उभारणी गतवर्षी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाकडे ३० लक्ष रुपयाचा निधीवर्ग करून सदर नदीवर संरक्षण भिंत बांधण्याचे आदेशित केले असून सदर नदीवर भिंत बांधताना राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाचे अधिकारी व कंत्राटदारांनी संगणमत करून निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याने यावर्षीच्या पावसाच्या पाण्याच्या प्रवाहात सदर भिंत व पुलावरील काम ढासळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट बांधकाम साहित्य वापरून करण्यात आलेल्या या कामाची गुण नियंत्रक विभागामार्फत चौकशी करून भ्रष्टचार करणाऱ्या अधिकारी कर्मचारी व कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत गावकऱ्यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर संरक्षक भिंतीचे काम दर्जेदार करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटदारावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०६-२०२५) :** (१) अकोट-अकोला-नांदेड-लखनपूर-महाराष्ट्र राज्यसिमा राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१-A हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे आहे. जुलै २०२३ मध्ये ढगफुटीसदृष्य झालेल्या पावसामुळे आलेल्या खोराडी नदीच्या महापुरामुळे पाणी गावात शिरुन नुकसान झाले होते, अशा परिस्थितीत पूर प्रतिबंधक योजना करण्याच्यादृष्टीने राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत तात्पुरत्या स्वरुपात संरक्षक भींत बांधण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही,

राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत बांधण्यात आलेली संरक्षक भिंत ही नायगाव बंदी मंगरुळपीर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१-A कामाच्या संकीर्ण बाबीच्या तरतूदीतून बांधण्यात आलेली असून रू. २५.५९ लक्ष खर्च झालेला आहे. सदर काम रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालयातर्फे नेमण्यात आलेल्या प्राधिकरण अभियंत्याच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आले असून सद्यस्थितीत सदर काम सुस्थितीत आहे.
(३) हे खरे नाही,

दिनांक ५ डिसेंबर २०२४ च्या सुमारास गावकऱ्यांनी कोणतेही निवेदन राष्ट्रीय महामार्ग विभागास सादर केलेले नाही. तथापि, पंचायत समिती सदस्य मानोरा यांचे संरक्षक भिंतीच्या कामाचे चौकशी करण्याबाबतचे निवेदन राष्ट्रीय महामार्ग विभागास प्राप्त झाले आहे.
(४) नाही,

सदर भिंतीचे बांधकाम हे साहित्य व गुणवत्ता यामध्ये कुठलीही तडजोड न करता नायगांव बंदी-मंगरुळपीर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१-A या कामावर देखरेखीकरिता रस्ते व वाहतूक मंत्रालय तर्फे नेमणूक करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या अभियंत्याच्या देखरेखीखाली करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरकवडा ते यवतमाळ येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४५) ६११७ (३०-०४-२०२५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्याचा मुख्य मार्ग असलेल्या पांढरकवडा ते यवतमाळ रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पांढरकवडा ते यवतमाळ रस्त्याच्या नूतनीकरणासाठी शासनाने मंजुरी दिली आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रस्त्याच्या कामाला मंजुरी देऊन सुरू करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) सदर रस्त्यापैकी पांढरकवडा ते मोहदा हा रस्ता सुस्थितीत आहे.
मोहदा ते यवतमाळ हा रस्ता ADB टप्पा-३ मध्ये मंजूर असून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे व सद्यःस्थितीत काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड व पुणे जिल्हयातील रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम मान्यते अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४६) ६३१७ (३०-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड व पुणे जिल्हयातील नेरळ, वांद्रे,पाईट शिरोली ,पाबळ,मालवण, शिरुर या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम मान्यते अभावी प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त चौपदरीकरणाचा प्रस्ताव शासनास दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चाकण येथील वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास केव्हा मान्यता मिळण्याचे अपेक्षित आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२८-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे,
(३) व (४) निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार सदरचे काम हाती घेणे चे नियोजन आहे
(५) प्रश्न उध्दवत नाही

---

## वसई-विरार महानगरपालिकेतर्फे प्राधिकृत अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत

**(४७) ६५७४ (०५-०५-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या इमारतीचे पुर्नविकास कामी उपनिबंधक कार्यालय, यांच्याकडून अधिनियम १९६० चे कलम १५४ व २७ (२) अन्वये अधिकारानुसार विशेष सर्व साधारण सभा घेण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. विभुते यांची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राधिकृत अधिकारी यांनी सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे दिनांक ४ जुले, २०२९ च्या आदेशानुसार सन २०२१-२०२४ या कालावधीत गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या इमारतीचे पुनर्विकास कामी किती संस्थांना आदेश पारीत करून त्यासंदर्भात सभा घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कालावधीत घेण्यात आलेल्या बैठकीतून पालिका क्षेत्रातील इमारतीच्या पुनर्विकासकामी नागरीकांच्या हिताचे कोणते निर्णय घेण्यात आले असून त्यांच्याकडून पोलीस संरक्षण, हॉल, मंडप, चहापाणी, नाश्ता व इतर खर्च करण्यात आल्याचे देयके सादर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही चुकीचे निर्णय घेण्यात आले असल्यास ते रद्द करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०७-०७-२०२५) :** (१) होय,
(२) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत सहकार विभागाकडून दिनांक ०४ जुलै, २०१९रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

सन २०२१ ते २०२४ या कालावधीत वसई तालुक्यातील एकूण २१९ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारत पुनर्विकासासाठी प्राधिकृत अधिकारी यांचे नियुक्ती आदेश उपनिबंधक सहकारी संस्था वसई यांचेकडून पारीत करण्यात आले आहेत. त्यापैकी ६ संस्थांच्या विकासक बदलामुळे त्यांच्या दोन वेळा सभा घेतल्या असल्याने अशा एकूण २२५ सभा घेण्यात आल्या आहेत.
(३) नाही,

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास सभांमध्ये संस्थेच्या पुनर्विकासासंबंधी निर्णय घेण्यात आले. विकासक निवडीसाठी आयोजित विशेष सर्वसाधारण सभांसाठी होणारा खर्च पोलीस सरक्षण, हॉल, मंडप, चहापाणी, नाश्ता व इतर खर्च हा संबंधीत गृहनिर्माण संस्थांकडून करण्यात येतो.
(४) व (५), प्रश्न उदभवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील नद्या नाल्यांवर पुल नसल्यामुळे पावसाळयात रहदरी ठप्प होत असल्याबाबत**

**(४८) ६९९० (०१-०५-२०२५). डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लहान नद्या-नाल्यांचे जाळे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नाल्यांवर पूल नसल्यामुळे किंवा असल्यास त्यांची उंची कमी असून त्यामुळे पावसाळयात त्यावरून चालणारी रहदारी असल्यामुळे पुरामुळे वारंवार ठप्प होत असून नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समस्येवर कायमचा तोडगा काढण्यासाठी काही उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून येत्या दोन-तीन वर्षांत हा प्रश्न मार्गी लागण्याबाबत कोणती योजना केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.(२) अतिवृष्टी झाल्यास काही कालावधीकरिता पुलावरील वाहतूकीवर परिणाम होतो हे खरे आहे.

(३) व (४) पावसाळया दरम्यान जिल्हयातील संपर्क तुटणाऱ्या गावांकरिता पुलांची सुसाध्यता तपासून निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.**

**(४९) ७०३५ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील सहाय्यक निबंधक कार्यालयास स्वत:ची इमारत नसून कार्यालयात सोयी- सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यालयातील कर्मचारी वर्ग कमी असल्याने बाकीच्या कर्मचा-यावर कामाचा अधिक ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (३०-०६-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) नांदेड जिल्ह्यात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.मुखेड मार्केट यार्ड, मुखेड पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे, ता.मुखेड, जि.नांदेड येथे हे कार्यालय भाडेतत्वावरील असलेल्या इमारतीत आहे. सदर कार्यालयास शासनाच्या १०० दिवसाचे कार्यक्रम योजनेअंतर्गत स्वच्छतागृह, पाण्याची व्यवस्था, लाईट, पिण्याचे पाणी फर्निचर, अभ्यागंतासाठी बसण्याची सुविधा तयार करण्यात आलेल्या आहेत.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. मुखेड कार्यालयात एकूण ०९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी वर्ग-३ ची एकूण ०७ पदे मंजूर पदे असून ४ पदे भरलेली आहेत तर ०३ पदे रिक्त आहेत.

परंतू अतिरिक्त पदभार दिल्यामुळे कर्मचाऱ्यावर कामाचा अधिक ताण पडत असलेबाबत वर्ग-३ कर्मचारी यांची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग, (ता.जि.बीड) येथील कंत्राटदार यांच्या कामनिहाय तक्रारीबाबत.**

**(५०) ७०४८ (०१-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य महामार्ग ५५ ते म्हाळसजवळा-जरूड-बोरफडी-येळंब-चौसाळा रोड (ता.जि.बीड) येथील एमडीआर ३४ कि.मी.१५/६०० पुल बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभाग,बीडच्या वतीने जा.क्र.९३५ दिनांक ११.०३.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु रस्ता हा नागरीकांच्या रहदारीसाठी उपयुक्त असतांना देखिल आजतागायत कार्यारंभ देऊनही कंत्राटरामार्फत पुलाचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी निविदा प्रक्रिया राबविताना संबधित विभागाकडून कंत्राटराच्या कागदपत्राची योग्य रित्या पडताळणी न करता कंत्राटराला कार्यारंभ आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटदाराकडून पुलाच्या बांधकामास होत असलेला विलंब तसेच कंत्राटदाराचे सर्व कागदपत्रे, कामनिहाय तथा संचिकानिहाय तपासणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबधित विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुलाचे बांधकाम तात्काळ करण्याबाबत तसेच कंत्राटदेताना आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची पडताळणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२०-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.

(५) निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांच्या कागदपत्रांची पडताळणी निविदा अटी व शर्तीनुसार करण्यात आलेली आहे. कागदपत्रांच्या पडताळणीनंतर पात्र कंत्राटदारांच्या ई-निविदा उघडण्यात आल्या असून प्राप्त निम्नत्तम कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर कामाची मुदत दिनांक ११/०३/२०२५ पर्यंत होती.

कंत्राटदारास काम सुरु करण्याबाबत वारंवार नोटीस देऊनही अद्याप काम सुरु केले नसल्याने कंत्राटदाराकडून दिनांक ११/०३/२०२५ पासून प्रतिदिन रु. ५००/- प्रमाणे दंडात्मक कार्यवाही केली आहे. तसेच कंत्राटदारास तात्काळ काम सुरु करणेबाबत कळविले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.